शहर परिसर

युवा संशोधक उलगडणार निसर्गरहस्ये

पुणे : 'जीविधा' संस्थेतर्फे २६ ते ३० ऑक्टोबरदरम्यान 'शोधयात्रा - युवा संशोधकांच्या नजरेतून निसर्गाचा अनोखा प्रवास' या संकल्पनेवर आधारित पर्यावरण व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे. दररोज सायंकाळी साडेसहा वाजता इंद्रधनुष्य पर्यावरण केंद्र, राजेंद्रनगर, म्हात्रे पुलाजवळ येथे ही व्याख्यानमाला होणार आहे, अशी माहिती संस्थेचे संस्थापक राजीव पंडित आणि वृंदा पंडित यांनी दिली. निसर्गातील अद्भुत रहस्ये उलगडण्याचा प्रयत्न या व्याख्यानमालेतून केला जाणार आहे. २६ ऑक्टोबरला ईशान पहाडे 'कीटक व आपण', २७ ऑक्टोबरला मिहिर जोशी 'विंचवाचे विश्व', २८ ऑक्टोबरला हृषिकेश करंदीकर 'दुर्मीळ रानपिंगळ्याच्या मागावर', २९ ऑक्टोबरला अर्णव गंधे 'संरक्षित क्षेत्राबाहेरील वन्यजीवांचे कॅमेरा ट्रॅपच्या माध्यमातून संवर्धन' आणि ३० ऑक्टोबरला आनंदी कोरडे 'वनस्पती सह्याद्रीच्या कडेकपारीतल्या' या विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत.

पुण्यात रविवारी मुख्याध्यापक परिषद

पुणे : समाजमाध्यमांच्या वाढत्या वापरामुळे मुलांचे अभ्यासातील लक्ष कमी होत आहे. या समस्येवर चर्चा करण्यासाठी आणि उपाय शोधण्यासाठी पुण्यात ५ व्या 'प्रिन्सिपल्स कॉन्क्लेव्ह'चे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी (ता. २५) कल्याणीनगर येथील हयात हॉटेलमध्ये सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत ही परिषद होईल, अशी माहिती सुरभी सहाय यांनी दिली. हार्टफुलनेस, ब्राइटर माइंड्स, अश्विनी इंटरनॅशनल स्कूल आणि भारती भवन यांच्या वतीने या मुख्याध्यापक परिषदेचे (प्रिन्सिपल्स कॉन्क्लेव) आयोजन केले आहे. यासाठी ८० हुन अधिक मुख्याध्यापक उपस्थित राहणार असणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. पत्रकार परिषदेस अश्विनी इंटरनॅशनल स्कूलच्या संचालिका इला राठौर उपस्थित होत्या.

महापालिकेसमोरच 'जायका'चे निकृष्ट काम

पुण्यात नियमांना फाटा; चिखलातच सांडपाणी वाहिनी जोडण्याचा प्रकार

पुणे, ता. २२ : मुळा-मुठा नदी प्रदूषण नियंत्रण प्रकल्पांतर्गत (परमं) महापालिका भवनासमोरच एक हजार ६०० मिमी व्यासाची सांडपाणी वाहिनी टाकताना नियमांना फाटा देऊन निकृष्ट काम केले जात असल्याचे समोर आले आहे. चिखलातच वाहिनी जोडली जात असून, या गंभीर प्रकारानंतर प्रशासनाने कामात सुधारणा करण्याचे आश्वासन दिले आहे.

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेअंतर्गत 'जायका' या जपानच्या बँकेच्या अर्थसाह्याने 'पोल्यूशन अबेटमेंट ऑफ रिव्हर मुळा-मुठा' (परमं) प्रकल्पाचे काम गेल्या चार वर्षांपासून सुरू आहे. या अंतर्गत सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाची (एसटीपी) कामे ९५ टक्के पूर्ण झाली आहेत, पण गेल्या चार वर्षांत ५३ पैकी केवळ २१ किलोमीटर लांबीच्याच सांडपाणीवाहिन्या टाकल्या आहेत. यासंदर्भात 'सकाळ'ने 'वाहिन्यांमध्येच अडकला जायका' या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित केले होते.

महापालिकेच्या समोर टिळक पुलाच्या शेजारी नदीपात्रात एक हजार ६०० मिमी व्यासाची सांडपाणीवाहिनी टाकली जात आहे. यासाठी खोदलेल्या खड्ड्यात अर्धी वाहिनी बुडेल इतके पाणी व चिखल जमा झाले आहे. हा चिखल न काढता खड्ड्यात वाहिन्या एकमेकांना जोडल्या जात आहेत. त्यामुळे भविष्यात वाहिन्यांची पातळी खालीवर होऊन त्यातून गळती सुरू होण्याची शक्यता आहे. चिखलात खडी टाकून त्यावर वाहिनी टाकल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. तसेच, दोन वाहिन्या जेथे जोडतात, त्या ठिकाणी बसविण्यात येणारी रबर रिंग तुटणे, दोन वाहिन्या जोडल्यानंतर त्यांच्यावर



पुणे : महापालिका भवनासमोर नदीपात्रात सांडपाणी वाहिनी खड्ड्यात टाकण्यासाठी क्रेन वापरण्याऐवजी पोकलेनने ढकलून नेली जात आहे.

लावलेल्या सिमेंटला पाणी न मारल्याने भेगा पडल्याचे निदर्शनास आले आहे.


पोकलेनमुळे वाहिन्यांचे नुकसान

निविदेतील अटी-शर्तींनुसार सांडपाणीवाहिन्या क्रेनच्या सहाय्याने उचलून त्या अपेक्षित ठिकाणी नेणे आवश्यक आहे. मात्र, प्रत्यक्षात पोकलेनच्या सहाय्याने वाहिन्या लांबून ढकलत खड्ड्यात टाकल्या जात आहेत. त्यामुळे नुकसान होऊन वाहिन्या एकमेकांना जोडल्या जाणार नाहीत आणि त्यातून सांडपाण्याची गळती होण्याची शक्यता आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

अधिकाऱ्यांकडून देखरेख नाहीच

■ पुढील १५ वर्षांचा विचार करून हा प्रकल्प तयार केला आहे. या कामावर महापालिकेचे अभियंता, सल्लागार यांनी व्यवस्थित देखरेख करणे आवश्यक आहे. मात्र, या ठिकाणी चुकीच्या पद्धतीने काम सुरू असतानाही महापालिकेचे अधिकारी उपस्थित नसल्याचे 'सकाळ'च्या पाहणीत समोर आले.

वाहिन्यांमध्येच अडकला 'जायका'



१९ पैकी १८ ठिकाणची कामे अपूर्ण : एसटीपी पूर्ण होऊनही खोळंबा

'परमं' प्रकल्पांतर्गत सांडपाणी वाहिन्या टाकण्याचे काम सुरू आहे. महापालिका भवनासमोर सुरू असलेल्या कामात ज्या त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत, त्या दुरुस्त केल्या जातील. क्रेनचा वापर न करता वाहिनी आणणे चुकीचे आहे. त्यामुळे ठेकेदाराला नोटीस बजावली जाईल. तसेच, खराब झालेल्या वाहिन्या बदलल्या जातील.

- संजय गायकवाड,
अधीक्षक अभियंता, परमं प्रकल्प

ट्रकच्या धडकेत महिलेचा मृत्यू

तळेगाव दाभाडे, ता. २२ : मालवाहू ट्रकची धडक बसून दुचाकीवरील महिलेचा मृत्यू झाला, तर तिचा मुलगा जखमी झाला. हा अपघात मावळ तालुक्यातील मंगरूळ येथे गुरुवारी सकाळी झाला. या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी रस्त्यावर ठिय्या मांडत आंदोलन केले, तसेच संबंधित ट्रकचालकावर कारवाईची मागणी केली.

नानीबाई सोपान नखाते (वय ७५, रा. मंगरूळ, ता. मावळ) यांचा या अपघातात मृत्यू झाला, तर मुलगा विजय हे जखमी झाले. हे दोघे नवलाख उंब्रे येथे जात असताना मंगरूळ परिसरात ट्रकने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. यात नानीबाई गंभीर जखमी झाल्या. त्यांना खासगी रुग्णालयात दाखल केले; मात्र उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. तर, विजय यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. अवजड वाहनांमुळे वारंवार अपघात होत असल्याचा आरोप करत त्यांनी आंदोलन सुरू केले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलिस अधिकारी आणि नायब तहसीलदार घटनास्थळी आले. त्यांनी आंदोलकांना शांत करण्याचा प्रयत्न केला.

महाराष्ट्र दुष्काळ निवारण समितीची स्थापना

पुणे, ता. २२ : महाराष्ट्रातील गंभीर दुष्काळी परिस्थिती, त्याचे सामाजिक व आर्थिक परिणाम आणि उपाययोजनांवर चर्चा करण्यासाठी पुण्यात राज्यस्तरीय दुष्काळ आढावा बैठक झाली. यात महाराष्ट्र दुष्काळ निवारण आणि निर्मूलन समितीच्या स्थापनेची घोषणा करण्यात आली.

या बैठकीस महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून सुमारे ८० सामाजिक कार्यकर्ते व संस्था-संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी विविध भागांतील दुष्काळाची गंभीर परिस्थिती मांडली. ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्ते सुभाष वारे यांनी ''दुष्काळासारख्या आपत्तीच्या काळात बाधित लोकांचे जीवनमान सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी सरकारसह उद्योग आणि सामाजिक संस्था-संघटनांचीही आहे'', असे मत व्यक्त केले. अध्यक्षस्थानावरून बोलताना ललित बाबर यांनी दुष्काळ हा केवळ पाणी आणि शेतीपुरता मर्यादित प्रश्न नसून रोजगार, शिक्षण, आरोग्य, अन्नसुरक्षा आणि स्थलांतराशी संबंधित व्यापक प्रश्न असल्याचे सांगितले.



एस. एम. जोशी फाउंडेशन, नवी पेठ : राज्यस्तरीय दुष्काळ आढावा बैठकीत सहभागी विविध संस्था-संघटनांचे प्रतिनिधी.

याप्रसंगी सुजाता भोंगाडे, राजकुमार धुरगुडे, वैशाली गवंडी, सीमा कुलकर्णी, युवराज गटकळ, उपेंद्र टण्णू आदी उपस्थित होते. डॉ. आंबेडकर शेती विकास व संशोधन संस्था, मकाम, एस. एम. जोशी सोशलिस्ट फाउंडेशन, दिशा सामाजिक संस्था, राष्ट्रसेवा दल, श्रमिक मानवाधिकार संघ, ग्राम भारती, कुरुंदवाड सोशल फाउंडेशन, मराठवाडा समन्वय समिती, दलित महिला विकास मंडळ, अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि विदर्भ मोलकरीण संघटना आदींचे प्रतिनिधी या बैठकीत सहभागी झाले.

शुल्क माफीची मागणी

दुष्काळग्रस्तांना आर्थिक मदत देण्यासह रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी, मजुरीच्या दरात वाढ, मजुरी वेळच्या वेळी देणे, पाणलोट विकास आणि जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य, पशुधनासाठी चाऱ्याची व्यवस्था, रेशनद्वारे आवश्यक वस्तूंचा पुरवठा आणि दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्याची मागणी बैठकीत करण्यात आली.

कात्रज डेअरीकडून दूध खरेदी दरात वाढ

दूध उत्पादकांना आर्थिक दिलासा; शेतकऱ्यांची दिवाळी गोड

कात्रज, ता. २२ : दिवाळी सणाचे औचित्य साधून पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाने (कात्रज डेअरी) गाय आणि म्हशीच्या दूध खरेदी दरात प्रतिलिटर एक रुपयाची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. २१ ऑक्टोबरपासून हे नवीन दर लागू झाले असून, यामुळे जिल्ह्यातील हजारो दूध उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळणार आहे.

वाढता चारा, वैरण आणि वाहतूक खर्च लक्षात घेऊन संघाने हा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे खरेदी दरात वाढ करताना ग्राहकांसाठीच्या विक्री दरात कोणतीही वाढ केलेली नाही. नवीन दरानुसार, ३.५ फॅट आणि ८.५ एसएनएफ असलेल्या गायीच्या दुधासाठी प्रतिलिटर ४३ रुपये, तर ६.० फॅट आणि ९.० एसएनएफ असलेल्या म्हशीच्या दुधासाठी प्रतिलिटर ५५ रुपये २० पैसे खरेदी दर निश्चित केला आहे. हे दर दूध उत्पादक संस्थांसाठी वरकड खर्चासह लागू असतील.

दूध व दुग्धजन्य पदार्थांची वाढती मागणी, दुग्ध व्यवसायातील वाढता उत्पादन खर्च आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचा विचार करून ही दरवाढ करण्यात आली आहे. त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिवाळीच्या काळात अतिरिक्त आर्थिक आधार मिळणार आहे.

- अरुण चांभारे, अध्यक्ष

दिवेघाटामध्ये आज दोन तास वाहतूक बंद

पुणे, ता. २२ : आळंदी ते पंढरपूर पालखी महामार्गाच्या रुंदीकरणासाठी दिवेघाटात शुक्रवारी (ता. २३) ब्लास्टिंग (स्फोट) करण्यात येणार आहे. त्यामुळे सुरक्षिततेचा उपाय म्हणून दुपारी १२ ते २ या वेळेत दिवेघाटातील वाहतूक दोन्ही बाजूंनी पूर्णपणे बंद ठेवली जाणार आहे. या कालावधीत वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा अवलंब करावा, असे आवाहन भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि शहर वाहतूक पोलिसांनी केले आहे. पालखी महामार्गावरील हडपसर ते दिवेघाट या टप्प्यात रस्ता रुंदीकरणाचे काम वेगाने सुरू आहे. घाटातील अवघड व खडकाळ भागातील रुंदीकरणासाठी नियंत्रित ब्लास्टिंग केले जाणार आहे. नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेऊन दोन तास घाटातील वाहतूक थांबवण्यात येईल. प्रवाशांनी सासवड, जेजुरी किंवा पुण्याच्या दिशेने ये-जा करण्यासाठी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे यांनी केले आहे.

THE DECCAN SUGAR TECHNOLOGISTS' ASSOCIATION (INDIA)
17/1 & 2, 'DSTA House', Opp. Dalvi Hospital, Shivajinagar, Pune-05
Phone : +91-20-25536044 | **Email :** info@dstaindia.com

TENDER NOTICE

Offers are invited from competent firms for installation, operation and transfer of setup required for testing and analysis of components and products for drip irrigation system on BOOT basis.

Offers should include company profile and related work done in this field. Offers must reach our office on or before **26 October 2026 upto 5:30 PM.**

President
DSTA

पुणे शहर परिसरात डेंगीचे तीन हजारांहून अधिक रुग्ण

प्रादुर्भाव रोखण्यात महापालिका अपयशी

पुणे, ता. २२ : शहरामध्ये तब्बल तीन हजारांपेक्षा जास्त डेंगीचे रुग्ण झाले असताना आणि डेंगीमुळे आठ वर्षांच्या मुलीचा मृत्यू झाल्यानंतरही महापालिकेचा आरोग्य विभाग अजूनही ढिम्मच आहे. शहराच्या वेगवेगळ्या भागांमध्ये रुग्ण वाढत असूनही त्यावर प्रतिबंध करण्यासाठी कुठल्याही ठोस उपाययोजना आरोग्य विभागाकडून केल्या जात नाहीत. विशेषतः रुग्ण आढळल्यानंतरही संबंधित परिसरात औषध फवारणी किंवा आवश्यक उपाययोजना करण्याचे गांभीर्य आरोग्य विभागाला आले नाही.

शहरामध्ये मागील दोन महिन्यांपासून डेंगी, हिवतापाचा प्रादुर्भाव वाढत आहे. दोन दिवसांपूर्वीच आठ वर्षांच्या मुलीचा डेंगीमुळे मृत्यू झाला आहे, त्यापाठोपाठ टिंगरेनगरमधील अडीच वर्षांच्या मुलीला डेंगीची लागण झाल्यानंतर काही दिवसांपासून ती अतिदक्षता विभागामध्ये उपचार घेत होती. बरी झाल्यानंतर तीच्या घराच्या परिसरात औषध फवारणी करण्यात आली नाही.

डेंगीबाबत महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून औषध फवारणी किंवा आवश्यक उपाययोजना केवळ कागदावरच केल्या जात असल्याबद्दल गुरुवारी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीमध्येही संताप व्यक्त करण्यात आला. दरम्यान, एकाच घरातील तिघांना डेंगीची लागण झाल्याचीही माहिती पुढे आली.

'शहरात दोन महिन्यांपासून डेंगीचा प्रादुर्भाव वाढत असतानाही महापालिका मनुष्यबळाचे कारण पुढे करत उपाययोजनांकडे दुर्लक्ष करत आहे,' असा आरोप स्थायी समितीच्या बैठकीमध्ये नगरसेवक सुहास टिंगरे यांनी केला, तर स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी आरोग्य विभागाच्या कारभाराबाबत संताप व्यक्त केला. तसेच संबंधित विभागाची जबाबदारी सांभाळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश त्यांनी दिले.

डेंगीचे रुग्ण	
एकूण संशयित रुग्ण	३१५४
पुणे शहराबाहेरील रुग्ण	२४१३
ऑगस्टमधील रुग्ण	५६८
सप्टेंबरमधील रुग्ण	७२६
ऑक्टोबरमधील रुग्ण	५५३

डेंगीमुळे मुलीचा मृत्यू झाला, तसेच हजारो नागरिक डेंगीमुळे रुग्णालयात दाखल असताना आरोग्य विभाग कुठलीही कारवाई किंवा प्रतिबंधात्मक उपाययोजना करत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी व आवश्यक उपाययोजना तातडीने कराव्यात, असे आदेश दिले आहेत.

- श्रीनाथ भिमाले, अध्यक्ष, स्थायी समिती, पुणे महापालिका

आरोग्य विभागाकडून डेंगीच्या पार्श्वभूमीवर औषध फवारणी, तसेच आवश्यक उपाययोजना केल्या जात नाहीत. सत्ताधाऱ्यांचा प्रशासनावर वचक नाही.

ॲड. नीलेश निकम, विरोधी पक्षनेते, पुणे महापालिका

सकाळ MONEY | सकाळ
आयोजित
Aditya Birla Sun Life Mutual Fund | ADITYA BIRLA CAPITAL MUTUAL FUNDS
प्रस्तुत
'आर्थिक साक्षरता' कार्यक्रम
गुंतवणुकीच्या विविध संधी, डिजिटल व्यवहारांमधील सुरक्षितता


श्री. शिरीष देशपांडे
(सायबर सुरक्षा तज्ञ)
सायबर सजगता अभियान


श्री. शैलेंद्र दीक्षित
(क्षेत्रीय व्यवस्थापक
आदित्य बिर्ला सन लाईफ
म्युच्युअल फंड)


श्री. अमित मोडक
(ज्येष्ठ कमोडिटीतज्ज्ञ
आणि संचालक
पीएनजी अँड सन्स)

- बदलत्या बाजारपेठेचे स्वरूप, योग्य गुंतवणुकीचा दृष्टिकोन आणि भविष्यासाठी आर्थिक नियोजन समजून घेण्याची संधी.
- दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टांसाठी योग्य दृष्टिकोन कसा ठेवावा
- सोने, चांदी आणि म्युच्युअल फंडाद्वारे गुंतवणूक
- सायबर सुरक्षा व सायबर गुन्ह्यांचे स्वरूप

प्रवेश विनामूल्य
मर्यादित जागा

रविवार, २५ ऑक्टोबर २०२६
स. १० ते दु. १२
टिळक स्मारक मंदिर, टिळक रोड, पुणे

रजिस्ट्रेशनसाठी
स्कॅन करा

लकडिया सी पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड

(पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडची १००% पूर्ण मालकीची उपकंपनी)
बी-९, कुताब इन्स्टिट्यूशनल एरिया, कतवरिया सराई, नवी दिल्ली-११० ०१६
U42201DC2026GOI470955

सूचना
(इलेक्ट्रिसिटी ॲक्ट,२००३ च्या कलम १५ चे उपकलम (२) अंतर्गत)

१. लकडिया सी पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड, ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय **बी-९, कुताब इन्स्टिट्यूशनल एरिया, कतवरिया सराई, नवी दिल्ली-११००१६** येथे आहे आणि जी कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत नोंदणीकृत आहे, त्यांनी इलेक्ट्रिसिटी कायदा, २००३ च्या कलम १५ मधील उपकलम (१) अंतर्गत केंद्रीय विद्युत नियामक आयोग, नवी दिल्ली यांच्याकडे ट्रान्समिशन लाईन्स, उपकेंद्रे आणि इतर मालमत्तांच्या बाबतीत ट्रान्समिशन परवाना मंजूर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. त्याचा तपशील खालीलनुसार आहे.

अ. क्र.	लाईन/ उपकेंद्राचे (ठिकाण) नाव	लाईन लांबी/ क्षमता	अंदाजे पूर्तता किंमत/लेव्हिलाईज्ड् ट्रान्समिशन शुल्क	परिशिष्ट सीओडी	शेरा
१	आळेफाटा उपकेंद्र येथे 765/400kV, 2×1500MVA आणि 400/220kV, 3×500 MVA क्षमतेच्या उपकेंद्राची उभारणी, तसेच 2×330 MVAR 765kV बस रिॲक्टर आणि 2×125 MVAR 400kV बस रिॲक्टर. [765kV आणि 400kV बस सेक्शनलायझर सामान्यतः बंद ठेवण्यात येतील. ग्रिडच्या परिस्थितीनुसार ते उघडले जाऊ शकतात.] भविष्यातील जागेची तरतूद : • 765/400kV, 1500MVA ICT आणि त्यासंबंधित बे-4 नग (Sec-I वर 2 आणि Sec-II वर 2) • 765kV लाईन बे आणि स्विचेबल लाईन रिॲक्टर- 6 नग (Sec-I वर 2 नग आणि Sec-II वर 4 नग) • 765kV, 330MVAr बस रिॲक्टर आणि त्यासंबंधित बे-2 नग (Sec-I वर 1 आणि Sec-II वर 1) • 400/220kV, 500MVA ICT आणि त्यासंबंधित बे-7 नग (Sec-I वर 2 आणि Sec-II वर 5) • 400kV लाईन बे आणि स्विचेबल लाईन रिॲक्टर-10 नग (Sec-I वर 4 आणि Sec-II वर 6) + 4 नग HVDC इंटरकनेक्शनसाठी 400kV बे (प्रत्येक विभागावर 2 नग) • 420kV, 125MVAr बस रिॲक्टर आणि त्यासंबंधित बे-2 नग (Sec-I वर 1 आणि Sec-II वर 1) • 220kV सेक्शनलायझर बे-1 संच • 220kV BC आणि TBC- प्रत्येकी 1 नग • 220kV लाईन बे-4 नग. Sec-I वर 4 नग आणि Sec-II वर 8 नग • आळेफाटा येथे 6000MW, ± 800kV (HVDC) [LCC] टर्मिनल स्टेशन (4×1500MW) ची उभारणी, त्यासंबंधित 400kV HVAC स्विचयार्ड आणि सर्व संबंधित उपकरणे (फिल्टर्ससह)/ बस विस्तार इत्यादी. प्रत्येक 400kV विभागावर (2×1500MW पोल).	765/400kV, 1500 MVA ICT -2 नग (7×500MVA सिंगल फेज युनिट्स, ज्यामध्ये 1 अतिरिक्त ICT युनिट समाविष्ट आहे.) (Sec-I वर 1 आणि Sec-II वर 1) • 400/220kV ICTs-3 नग (Sec-I वर) • 765kV ICT बे-2 नग • 400kV ICT बे-5 नग • 220kV ICT बे-3 नग • 765kV लाईन बे-6 नग. (Sec-I वर 4 नग : नाशिक D/c, पुणे (शिक्रापूर) आणि पाडघे S/c; आणि Sec-II वर 2 नग : पुणे (शिक्रापूर) आणि औरंगाबाद) • 1×330MVAr, 765kV बस रिॲक्टर-2 नग (7×110MVAR सिंगल फेज रिॲक्टर्स, ज्यामध्ये 1 अतिरिक्त युनिट समाविष्ट आहे. बस/ लाईन रिॲक्टरसाठी) (Sec-I वर 1 आणि Sec-II वर 1) • 765kV बस रिॲक्टर बे-2 नग • 220kV BC-1 नग • 220kV TBC-1 नग • 125MVAr, 420kV रिॲक्टर-2 नग (Sec-I वर 1 आणि Sec-II वर 1) • 400kV रिॲक्टर बे-2 नग • 400kV लाईन बे-2 नग (Sec-I वर) • 220kV लाईन बे - 4 नग (MSETCL 220kV लाईन्ससाठी : आळेफाटा (M) 220kV D/c आणि ब्रिजस्टोन 220kV D/c) • 765kV सेक्शनलायझर बे : 1 संच • 400kV सेक्शनलायझर बे : 1 संच	वार्षिक रुपये ४,३०६.७४ दशलक्ष दरवर्षी	३६ महिने	
२	आळेफाटा-लोणीकंद-I 400kV D/c लाईन (Quad ACSR/AAAC/AL59 मूस समतुल्य).	~22 किमी (44 ckm)			
३	आळेफाटा-लोणीकंद-I 400kV D/c लाईनसाठी लोणीकंद-I (MSETCL) उपकेंद्र येथे 02 नग. 400kV GIS लाईन बे	• संबंधित उपकरणांसह 400kV आउटडोअर GIS लाईन बे -2 नग (दुहेरी मुख्य योजना).			
४	औरंगाबाद-पुणे (शिक्रापूर) (GIS) 765kV S/c लाईन आणि पाडघे (GIS)-पुणे (शिक्रापूर) (GIS) 765kV S/c लाईनचे आळेफाटा उपकेंद्र येथे LILO.	LILO मार्गाची लांबी सुमारे ~20 km (80 ckm)			
५	नाशिक-आळेफाटा 765kV D/c लाईन.	~145 किमी (290 ckm)			
५अ	नाशिक-आळेफाटा 765kV D/c लाईनच्या नाशिक एंड येथे प्रत्येक सर्किटवर 765kV, 240 MVAr स्विचेबल लाईन रिॲक्टर.	•240MVAr, 765kV स्विचेबल लाईन रिॲक्टर-2 नग •765kV स्विचेबल लाईन रिॲक्टर बे-2 नग (नाशिक एंडसाठी). • नाशिक येथे यापूर्वीच मंजूर झालेला 80 MVAr, 765kV अतिरिक्त सिंगल-फेज रिॲक्टर [लकडिया (फेज II: 7.5GW), जाम खंभालिया (फेज-II: 5.5GW) आणि जामनगर (फेज-I: 1GW) येथून वीज बाहेर पाठविण्यासाठी "कॉमन ट्रान्समिशन सिस्टीम" अंतर्गत) भाग-B, दक्षिण ओलपाड-नाशिक 765kV D/c लाईनसाठी] वापरण्यात येईल.			
६	नाशिक-आळेफाटा 765kV D/c लाईनसाठी नाशिक उपकेंद्र येथे 765kV बे 2 नग	765kV लाईन बे-2 नग			

सूचना १ :
i) नाशिक उपकेंद्र येथे अनुक्रमांक ६ मधील कामासाठी TSP ने जागा उपलब्ध करून द्यावी. (विनामूल्य)
ii) अ.क्र. ३ मधील कामासाठी MSETCL ने जागा उपलब्ध करून द्यावी. (विनामूल्य)
iii) MSETCL ने आळेफाटा उपकेंद्रातून 220kV डाउनस्ट्रीम प्रणालीची अंमलबजावणी त्याच कालावधीत करावी.

सूचना २ :
i) पुणे (GIS)- औरंगाबाद 765kV लाईनच्या पुणे (GIS) एंडवरील 240MVAr लाईन रिॲक्टर हा यापूर्वीच स्विचेबल आहे. आळेफाटा (पुणे GIS)- आळेफाटा) येथे LILO नंतर लाईनची लांबी कमी होईल, लहान लाईनवरील अतिक्षतिपूर्तीमुळे निर्माण होणारी समांतर घटनेची समस्या टाळण्यासाठी NGR बायपासिंगसह इंटर ट्रिपिंग योजना राबवावी लागेल. तसेच स्विचेबल LR हा बस रिॲक्टर म्हणून वापरात नसताना NGR बायपासिंगमुळे त्याचा वापर शक्य होईल. POWERGRID ने दिनांक ०२-१२-२०२४ रोजीच्या ई-मेलद्वारे पुष्टी दिल्यानुसार, पुणे (GIS)- औरंगाबाद 765kV लाईनच्या पुणे (GIS) एंडवरील 240MVAr लाईन रिॲक्टरमध्ये NGR बायपास व्यवस्था उपलब्ध आहे. त्यामुळे केवळ मुख्य लाईन ब्रेकरसह ट्रिप स्विचेबल LR योजना सक्षम करणे आवश्यक राहील.
LILO ची अंमलबजावणी झाल्यानंतर, TSP ने POWERGRID च्या समन्वयाने याची खात्री करावी.
LILO नंतर, आळेफाटा औरंगाबाद लाईनची लांबी सुमारे ~190-200km, आळेफाटा-पाडघे सुमारे ~140km आणि आळेफाटा-पुणे (GIS) सुमारे ~70km असणे अपेक्षित आहे. या लांबी तात्पुरत्या असून त्यात बदल होऊ शकतो.
ii) आळेफाटा-पुणे (पश्चिम) 765kV D/c लाईनचा प्रस्ताव MSETCL ने त्यांच्या 2030 च्या मास्टर प्लॅनमध्ये दिला आहे. आवश्यकतेनुसार दोन्ही एंडला संबंधित बे सह MSETCL कडून त्याची अंमलबजावणी केली जाऊ शकते. आळेफाटा उपकेंद्राच्या 765kV Sec-II येथील लाईन समाप्त करण्यात यावी.
iii) आळेफाटा-लोणीकंद-I 400kV D/c लाईनच्या TSP कडून संबंधित योजनेअंतर्गत अंमलबजावणी झाल्यानंतर आणि पुणे (पूर्व) (कर्जत-II) उपकेंद्र-लोणीकंद-II 400kV D/c लाईनची MSETCL कडून In-STS योजनेअंतर्गत अंमलबजावणी झाल्यानंतर, लोणीकंद-I आणि लोणीकंद-II दरम्यानची 400kV आंतरजोडणी (Interconnector) सामान्यतः खुली ठेवण्यात येईल (दोष पातळी नियंत्रणासाठी). ग्रिडच्या कार्यवाहीच्या आवश्यकतेनुसार ती बंद केली जाऊ शकते. वरील लाईनच्या पूर्ततेनंतर TSP ने MSETCL ला आवश्यक माहिती द्यावी.

२. आयोगासमोर दाखल केलेला संपूर्ण अर्ज आणि इतर कागदपत्रे पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड यांच्या **www.powergrid.in/en/subsidiaries** या संकेतस्थळावर कोणत्याही व्यक्तीस पाहण्यासाठी उपलब्ध आहे. तसेच हा अर्ज कंपनीच्या कार्यालयात, C/o ED (Commercial & RC), पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड, मजला क्र. 02, टॉवर-01, IRCON इंटरनॅशनल टॉवर, प्लॉट नं. 16, इन्स्टिट्यूशनल एरिया, सेक्टर-32, गुरगाव-122003 येथे, श्री. निलेश श्रीराम ठाकरे, प्रकल्प प्रभारी, लकडिया सी पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड किंवा आयोगाच्या कार्यालयात आयोगाने निर्धारित केलेल्या कार्यपद्धतीनुसार पाहता येईल.

३. कोणत्याही हरकती किंवा सूचना असल्यास त्या सचिव, केंद्रीय विद्युत नियामक आयोग, ६ वा, ७ वा आणि ८ वा मजला, टॉवर बी, वर्ल्ड ट्रेड सेंटर, नौरोजी नगर, नवी दिल्ली-११००२९ यांच्याकडे दाखल कराव्यात. तसेच संबंधित हरकती/सूचनांची प्रत अधिकृत प्रतिनिधीमार्फत अर्जदारास पाठवावी. ही कार्यवाही सदर सूचना वृत्तपत्रात प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसांच्या आत करावी.

ठिकाण : गुरुग्राम
दिनांक : २३-१०-२०२६

प्रकल्प प्रभारी,
लकडिया सी पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड